# प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली
## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)
(०२३५८) २८२३८७

अंक ३०/२०१७ | दिनांक १३/०४/२०१७ | कालावधी ५ दिवस


| डॉ. उत्तम महाडकर, | डॉ. ज्ञानेश्वर जगताप, | प्रा. विरेश चव्हाण, |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी, |
| कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग |
| ९४२२७९१९९८ | ९४०३९८८१४३ | ९४२२०६५३४४ |


| मागील हवामान सारांश दि. ०९/०४/२०१७ ते १३/०४/२०१७ | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ०.० |
| पाऊस (मिमी) १/१/१७ पासून | : | ०.० |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | ४५०४.१ |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३२.२–३५.७ |
| किमान तापमान (अं.से) | : | १६.०–२३.४ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ७०–९५ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ५१–७२ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ३.९–४.५ |

| हवामान पूर्वानुमान (१४/०४/२०१७ सकाळी ८:३० पासून १८/०४/२०१७ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| हवामानांचे घटक | : | १४/०४ | १५/०४ | १६/०४ | १७/०४ | १८/०४ |
| पाऊस (मिमी) | : | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३४ | ३४ | ३४ | ३४ | ३४ |
| किमान तापमान (अं.से) | : | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ० | ० | ० | ० | ० |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ७३ | ८२ | ८० | ८४ | ८४ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ५४ | ५२ | ५२ | ५२ | ५२ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ००९ | ००६ | ०११ | ०१२ | ००५ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

### :हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:

**दिनांक १४ ते १८ एप्रिल, २०१७ पर्यंत अवकाश स्वच्छ सुर्यप्रकाशित राहिल. दिनांक १४ ते १८ एप्रिल, २०१७ पर्यंत वाऱ्याचा वेग ५ ते १२ किमी प्रति तास राहिल.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| आंबा, काजू | फळधारणा | • आंबा पिकावर तुडतुड्याचा प्रादुर्भावाची आर्थिक नुकसानाची पातळी ओलांडल्यास तुडतुड्याचे नियंत्रण करण्याकरिता डायमेथोएट ३० टक्के (WDG) प्रवाही १० ग्रॅम किंवा लॅम्बडा सायहेलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी फवारणी सोबत भूरी रोगाच्या नियंत्रणासाठी हेक्झाकानॅझोल ५ मिली किंवा गंधक २० गॅम किंवा कार्बेनडॅझीम १० ग्रॅम मिसळून वापरावे.<br>• फळधारणा झालेल्या आंबा झाडास उपलब्धतेनुसार शक्य आहे तिथे प्रति झाडास १० दिवसांच्या अंतराने १५० ते २०० लिटर पाणी द्यावे.<br>• आंबा फळांवर फळमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे, फळमाशीच्या नियंत्रणासाठी आंबा बागेत विद्यापीठाने शिफारस केलेले हेक्टरी ४ या प्रमाणात रक्षक फळमाशी सापळे लावावेत.<br>• आंब्यामध्ये काही ठिकाणी मोठया आकाराची काढणीची फळे तयार झाली असून ती काढणीच्या अवस्थेत आहेत. तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर झेल्याच्या सहाय्यान  ८० ते ८५ टक्के पक्वतेला काढावीत. काढलेली फळे साका टाळण्यासाठी व उष्णतेपासून बचाव करण्यासाठी सावलीत ठेवावीत. शिफारशीनुसार बुरशीनाशकाची व इथीलीनीची प्रक्रिया देऊन पीकवावीत. शक्यतो आंब्याची वाहतूक रात्रीच्यावेळी करावी. फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतेही औषध फवारू नये.<br>• काजू झाडावरील रोठा या किडीच्या नियंत्रणासाठी रोठयाच्या अळया १५ मि. मी. आकाराच्या पटाशीच्या सहाय्याने काढून टाकाव्यात व क्लोरोपायरीफॉस (२० टक्के प्रवाही) १० मि. लि. प्रति लिटर या प्रमाणात द्रावण तयार करून प्रादुर्भित भाग त्या द्रावणाने चांगला भिजवावा व उरलेले द्रावण झाडाच्या बुंध्यालगत मुळाशी ओतावे.<br>• काजूमध्ये काही ठिकाणी काढणीयोग्य बी तयार झालेली आहे. तयार झालेल्या बीयांची काढणी करुन ती उन्हामध्ये योग्यप्रकारे वाळवावी. |
| नारळ/ सुपारी | –– | • नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्डयात दर दोन महिन्यांनी कार्बारील पावडरचे (१० लिटर पाण्यात २० ग्रॅम) मिश्रण तयार करून फवारावे.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंग्यानी पाडलेली भोके १० टक्के कार्बारील भुकटी व वाळूने बुजवून घ्यावीत. तसेच खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० मिली ३६ टक्के प्रवाही मोनोक्रोटोफॉस किंवा २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस . २० मिली पाणी नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| भाजीपाला | वाढीची अवस्था | • वांगी, मिरची, कोबी, नवलकोल इ. पिकांवर मावा, तुडतुडे, फुलकीडी यांचा प्रादुर्भाव दिसून येताच मॅलेथिऑन (२० मिली प्रति १० लिटर पाण्यात) किंवा डायमिथोएट (१२ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात) मिसळून फवारावे.<br>• वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये फळमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे, फळमाशीच्या नियंत्रणासाठी आंबा बागेत विद्यापीठाने शिफारस केलेले हेक्टरी ४ या प्रमाणात रक्षक सापळे लावावेत. |
| कलिंगड लागवड | – | • कलिंगड पिकाची काढणी सुरू करावी, कलिंगडाची तयार फळे ओळखण्यासाठी फळाच्या देठाजवळील वेलतंतु सुकलेला असावा व कलिंगडाच्या जातीचा तयार होण्याचा कालावधी पुर्ण झालेला असावा, तसेच फळावर टिचकी मारली असता “दबदब” आवाज यावा.<br>• वेलवर्गीय भाजीपाला व कलिंगड पिकांच्या क्षेत्रामध्ये फळमाशीच्या नियंत्रणासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले रक्षक सापळे ४ नग प्रती हेक्टरी लावावेत. |
| दुभती जनावरे /शेळया | – | • जनावराना पाणी पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठयामधे हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी.<br>• बहुवर्शीय स्वरुपाच्या वैरणीच्या पीकांची उदा. पॅरॅग्रास, यशवंत, नेपीयर इ. लागवड करावी. |
| सुचना | – | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |